# सनवर्ल्ड फॉर सिनीयर्स

पोस्ट खानापूर, खानापूर - पानशेत रोड पुणे .

सूचना : प्रवेश घेऊ ईच्छिणा या ज्येष्ठ नागरिकाने शक्यतो आपल्या हस्ताक्षरात हा अर्ज भरावा. आपण भरून दिलेली माहिती पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल. अर्ज कृपाकरून पूर्ण भरावा. पूर्ण भरलेल्या अर्जावर निर्णय लवकर घेता येईल. हा अर्ज भरून दिला म्हणजे प्रवेश मिळाला असे नाही. पती पत्नी यांना स्वतंत्र अर्ज भरणे आवश्यक आहे. फॉर्ममधे दिलेली जागा पुरत नसल्यास वेगळा कागद जोडावा.

## प्रवेश अर्ज

१. पूर्ण नाव ( आडनाव प्रथम ) ____________________

२. कायम वास्तव्याचा पत्ता ____________________

____________________ दूरध्वनी ____________________

३. जन्म तारीख ____________ वय ____________ शिक्षण ____________

४. सध्या वास्तव्य कोणाकडे ? नाव ____________________

नाते ____________ पत्ता ____________________

____________ दूरध्वनी ____________ वास्तव्याचा कालावधी ____________

५. निवृत्तीपूर्व नोकरी की व्यवसाय करीत होता ?(हुद्दा) ____________________

६. व्यवसाय असल्यास कोणता ? कोठे ? ____________________

७. नोकरी असल्यास कोणाकडे ( पत्यासह) ____________________

____________________ दूरध्वनी ____________

८. किती वर्षे नोकरी केली / व्यवसाय केला ____________ ९. सेवानिवृत्तीची तारीख ____________

१०. सध्या मिळणारे पेन्शन – प्रति माह रू ____________ ११. अन्य उत्पन्न – प्रति माह रू ____________

१२. अन्य उत्पन्नाची साधने असल्यास कोणती ? ____________________

१३. स्वतःची मलमत्ता कुठे व किती ? त्यातून उत्पन्न किती येते ? ____________________

१४ . स्वतःच्या मालकीचे घर असल्यास कुठे ? ____________________

१५ . तुम्ही नेहमीसाठी सनवर्ल्ड मध्ये राहिल्यास, वाढत जाणा या महागाईत तुम्हाला तुमचे उत्पन्न पुरेल असे वाटते का ? हो / नाही

१६ . उत्पन्न न पुरल्यास त्यावेळी कोणी नातलग तुम्हाला आवश्यक ती आर्थिक मदत देऊ शकतील का ?असल्यास त्या व्यक्तिचे नाव, पत्ता, नाते, काय ? ते तशी हमी देऊ शकतील का ____________________

१७ . सनवर्ल्ड माहीती पत्रक वाचले का ? हो / नाही

१८ . आपण सनवर्ल्ड मध्ये का येऊ ईच्छिता ____________________

१९ . घरी मुले नातवंडे आणि इतर नातेवाईक यांच्यासोबत राहणे त्यांच्या पासून स्वतंत्र राहणे आणि सनवर्ल्ड मध्ये राहणे यापैकी तुम्हाला सर्वात सोयीचे कोणते वाटते ?____________________

२० . सनवर्ल्ड च्या रचनेशी येथील सामुदायिक जेवण व जीवन व्यवस्थेशी तुम्ही आनंदाने जमवून घेऊ शकाल असे तूम्हाला वाटते का ?____________________

२१ . सनवर्ल्डमध्ये राहायला आल्यावर वाचन चिंतन या व्यतिरिक्त तुमच्याजवळ बराच वेळ शिल्लक असेल तो वेळ तुम्हाला कसा घालवायला आवडेल . ____________________

२२ . आवडी निवडी छंद ____________________

२३ . सनवर्ल्डला कोणत्या स्वरूपाने तुमच्या ज्ञानाचा अनुभवाचा छंदाचा उपयोग तुम्ही करून देवू शकाल ?____________________

२४ . तुमची प्रकृती आज कशी आहे . ?____________________

शारीरिक व्यंग असल्यास कोणते ?____________________

ब्लडप्रेशर : हाय / ला ? किती ?__________ ब्लडशुगर : नॉर्मल / डायबेटिक ? किती ?__________

दृष्टी - नॉर्मल / चष्मा - किती नंबर ____________________

अन्य कोणत्या उपचाराची गरज सध्या आहे का ? आपल्या फॅमिली डॉक्टरचे नांव पत्ता व फोन नंबर तसेच इतर तज्ञ डॉक्टरांची नावे पत्ते व फोन नंबर .

आतापर्यतची मोठी आजारपणे - ऑपरेशन्सची माहिती द्यावी ______________________________

आपत्कालीन परिस्थितीत कोणत्या डॉक्टरांकडे जाणे पसंत कराल?______________________________

---

२५ .लाईफ इन्शुरन्स आहे का ? त्याचा तपशील ( झेरॉक्स कॉपी) ______________________________

२६ .हेल्थ इन्शुरन्स केला आहे का ? त्याचा तपशील ( झेरॉक्स कॉपी) ______________________________

२७ . काही कमी जास्त झाल्यास कोणास कळवावे, त्याचे नाव पत्ता ( जवळच्या खुणेसह ) व फोटो दूरध्वनी मोबाईल इ .______

______________________________________________________________

______________________________________________________________

२८ .नियमावलीची एक प्रत मान्यतेची सही करून या अर्जासोबत जोडली आहे काय ? ( जोडणे आवश्यक )____________

२९ .आणखी काही विशेष गोष्टी तुम्हाला संस्थेला कळवून ठेवणे आवश्यक वाटते का ? त्याचा येथे उल्लेख करावा _________

______________________________________________________________

वरील सर्व महिती मी प्रामाणिकपणे माझ्या हिताच्या दृष्टीने कळवली आहे . ती सत्य आहे . मी संस्थेचे नियम वाचले आहेत व ते मला मान्य आहे .

आपला / आपली विश्वासू

सही

दिनांक :

पूर्ण नाव__________________

साक्षीदार म्हणून दोन प्रतिष्ठित नागरिकांचे दाखले आणावे

१ नाव ______________________________

पत्ता ______________________________

२ नाव ______________________________

पत्ता ______________________________

______________________________ स्वाक्षरी

______________________________ स्वाक्षरी

अर्जदाराच्या कुटुंबियांची माहिती

| अ क. | पूर्ण नाव | पत्ता व दूरध्वनी कमांक | वय | नाते | शिक्षण | व्यवसाय / नोकरी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

## प्रवेश समिती अभिप्राय

प्रवेश देवू नये / तूर्त महिन्यांसाठी प्रवेश द्यावा.

कार्यकारी विश्वस्त

---

प्रवेश दिला. रजिस्टर वरील अनुकमांक

व्यवस्थापकाची सही

# नियमावली

## सनवर्ल्ड निवासींसाठी नियम

१ सनवर्ल्ड सर्व जाती धर्मासाठी खुले आहे.

२ सामान्यतः केवळ ६0 वर्षावरील पुरूष ५५ वर्षावरील स्त्रियांना सनवर्ल्ड मध्ये प्रवेश दिला जाईल.

३ प्रवेश अर्जासोबत डॉक्टरांचा वैद्यकीय दाखला देणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा गंभीर वा संसर्गजन्य आजार आढळल्यास प्रवेश नाकारला जाईल.

४ निवासींनी आपल्याबरोबर गरजेपूरतेच कपडे व दैनंदिन प्रसाधनांची समुग्री उदा. टूथपेस्ट दाढीचे सामान कंगवा डोक्याला लावायचे तेल स्त्रियांना लागणारी प्रसाधन सामुग्री इ.व टॉर्च आणावा.

५ निवासी जर नियमितपणे काही औषधे घेत असतील तर त्याचा खर्च त्यांनाच करावा लागेल.औषधाचा योग्य तो साठा निवासींनी आपल्याजवळ ठेवावा. औषधे आणायची असल्यास संचालकांना सांगावे. योग्य अवधीत औषधे आणून द्यायची व्यवस्था सेवक करतील.

६ सनवर्ल्ड च्या परिसरात मद्यपान धूम्रपान व मांसाहार वर्ज्य आहेत.

७ निवासींनी आपल्याबरोबर मौल्यवान वस्तूआणू नयेत व जरूरीपुरतेच पैसे जवळ ठेवावेत.

८ निवासीला आपल्या बरोबर कोणत्याही प्रकारचे वाहन आणता येणार नाही आणायचे असल्यास व्यवस्थापनची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

९ सनवर्ल्ड मधील वास्तव्याचे दरम्यान कुणाही निवासीताला काही गंभीर आजार आकस्मितरीत्या उदभवल्यास त्याला हॉस्पिटलमधे दाखल कारण्याची व्यवस्था सनवर्ल्ड व्यवस्थापनातर्फे केली जाईल.अशा निवासींच्या नातेवाईकास वारसास उपलब्ध संपर्क साधनाद्वारे शक्य तितक्या तातडीने कळवण्याची व्यवस्था केली जाईल.कोणत्या रूग्णालयात दाखल करावयाचे हे परिस्थिती पाहून संचालक ठरवतील.अशा आजारपणाचा व हॉस्पिटलचा खर्च निवासींना करावा लागेल.

१0 निवासींना घरामध्ये हिटर गॅस शेगडीचा व अन्य ज्वालाग्रही पदार्थांचा वापर करता येणार नाही.

११ निवासींनी सनवर्ल्ड च्या कामगारांशी पैशांचे व्यवहार करू नयेत.

१२ सनवर्ल्ड व्यवस्थापन आवश्यक वाटेल तेव्हा निवासींना ते रहात असलेले खोली बदलून दुस या खोलीमध्ये राहण्यास सांगू शकेल.निवासीला त्याप्रमाणे खोली बदलावी लागेल.

१३ निवासींना भेटीला येणारया व्यक्तीने व्यवस्थापनाकडून परवानगी घेऊनच निवासींना भेटावे. यासाठी पाहूण्यांसाठीचे नियम बघावेत. निवासींना कोणत्याही कारणास्तव त्यांच्या घरात त्यांचे नातेवाईक मित्र परिचित इ. कोणालही मुक्कामासाठी राहू देण्याची परवानगी मिळणार नाही. निवासींच्या सेवेसाठी आलेल्या पाहूण्यांनाही गेस्ट हाऊस मध्ये रहावे लागेल व त्यांच्या भोजन इ.चा आकार द्यावा लागेल.

१४ निवासींना व त्यांच्या पाहूण्यांना चहा नाश्ता व भोजनासाठी भोजनकक्षात ठरवून दिलेल्या वेळांना यावे लागेल. कोणाला काही कारणास्तव घरी डबा पोहोचवून हवा असल्यास व्यवस्थापनाचा त्याबद्दलचा निर्णय अंतिम असेल.

१५ सनवर्ल्ड व्यवस्थापनाकडून निवासीला घरात ज्या वस्तू देण्यात येतील उदा. खुर्च्या कपाट टेवल पलंग गाद्या चादरी इ.त्याचा चांगल्या रितीने वापर केला जावा ही व्यवस्थापनाची अपेक्षा आहे. हे सर्व फर्निचर व इतर वस्तू विचारपूर्वक तयार केलेले आहे. आरसा फूटणार नाही याची खबरदारी घ्यावी.अन्य किरकोळ वस्तूंचीपण काळजी घ्यावी. त्या हरवल्यास योग्य ती नुकसान भरपाई निवासींकडून घेण्यात येईल.

१६ निवासीतांनी पाणी आणि वीज याचा काळजीपूर्वक वापर करावा ही नम्र विनंती आहे. टीव्ही लॅपटॉप इ. चा वापर करण्यासाठी व्यवस्थापनाची परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी अतिरिक्त चार्ज द्यावा लागेल.

१७ निवासींना आपल्या घरात कोणत्याही प्रकारचे पाळीव प्राणी ठेवण्यास सक्त मनाई आहे.

१८ निवासींना आपल्या इच्छेप्रमाणे स्वतःच्या जबाबदारीवर बाहेर जाता येईल मात्र त्याने त्याची नोंदवहीत नोंद करावी बाहेर गेल्यावर घडलेल्या कोणत्याही घटनेला व्यवस्थापन जबाबदार असणार नाही.

१९ सनवर्ल्ड मधील वास्तव्याचे काळात निवासीला कोणत्याही प्रकारचा अपघात अगर शारिरीक इजा झाल्यास अपंगत्व आल्यास अगर मृत्यू ओढवल्यास संस्था अथवा सनवर्ल्ड व्यवस्थापन त्याला कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. आजारपणात निवासीला घरात सेवक हवा असे वाटले व तो सेवकाचा खर्च करण्यास तयार असला तर त्याला सेवक देण्याचा संस्था प्रयत्न करेल. कुठलाही सेवक निवासीने परस्पर ठेवू नये. सेवक ठेवायचा झाल्यास व्यवस्थापनाची परवानगी घ्यावी लागेल व त्याचा भोजन इ.चा खर्च निवासीला करावा लागेल.

२० निवासीचे नातेवाईक प्रत्यक्ष हजर होण्यापूर्वी व्यवस्थापनाला निवासीला रूग्णालयात दाखल करणे अथवा उपचाराबाबत निर्णय घेणे आवश्यक असल्यास तसा निर्णय व्यवस्थापन घेइल यासाठीचे संमतीपत्र निवासीने भरून देण्याचे आहे.या संदर्भात व्यवस्थापनाने घेतलेल्या निर्णयाबाबत निवासीच्या वारसांना / नातेवाइकांनी कोणत्याही प्रकारची तकार अथवा कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

२१ निवासी ज्येष्ठाचे सनवर्ल्डमध्ये दुदैवाने निधन झाल्यास त्याच्या नातेवाईकांना अथवा वारसदारांना लवकरात लवकर कळवले जाईल. आठ तासाच्या आत अथवा परिस्थितीनूसार योग्य त्यावेळात निवासीचे अधिकृत वारसदार किंवा नातेवाइक अंत्यविधी करण्यास आले नाहीत तर व्यवस्थापन. मृत व्यक्तिच्या पार्थिवावर यथायोग्य अंत्यसंस्कार करील.

२२ निवासीच्या मृत्यू नंतर त्यांची चिज वस्तू निवासीने फोटोसहित नमूद केलेल्या व्यक्तीकडेच सपूर्त करण्यात येतील. त्या व्यक्तींनी त्या वस्तू ९० दिवसाच्या आत घेऊन जाव्यात त्यानंतर त्याबाबत व्यवस्थापन कोणत्याही प्रकारे जबाबदार राहाणार नाही.

२३ निवासी सनवर्ल्डचे नियम पाळत नसेल अगर अन्य उपद्रव देत असेल तर व्यवस्थापन त्याला त्या करीता लेखी समज देईल.एक समज दिल्यावर व्यवस्धपन निवासीकडून चांगल्या वर्तनाची व नियम पाळण्याची अपेक्षा करील.या नंतरही सुधारणा न झाल्यास अशा निवासीला सनवर्ल्डमधून काढून टाकण्यात येईल.याचे संपूर्ण अधिकार संस्थेकडे व व्यवस्थापनाकडे असतील.

२४ सनवर्ल्डमधील प्रत्येक निवासीस त्याचा फोटो असलेले ओळखपत्र देण्यात येईल.ते त्यांनी नेहेमी स्वतःजवळ बाळगणे अपेक्षित आहे.

२५ सनवर्ल्डमधून बाहेर जाताना व प्रवेश करताना प्रवेशद्वारात ठेवलेल्या वहीत नोंद करावी.

२६ सनवर्ल्डमधील सेवकांबावत काही तकार वा सूचना असतील तर त्याबाबत व्यवस्थापनाशी बोलावे. सेवकांशी या बाबत बोलू नये.

२७ सनवर्ल्ड सोडून गेलेल्या व्यक्तिस पून्हा प्रवेश घ्यावयाचा असल्यास संस्थेच्या सल्लागार मंडळाच्या परवानगीनेच प्रवेश देण्यात येईल.

२८ सनवर्ल्डमध्ये प्रवेश घेतल्यानंतर निवासी व्यक्ति रहात असलेल्या खोलीवर त्या व्यक्तिच्या पश्चात तिच्या नातेवाईकास अथवा वारसदारास कोणत्याही प्रकारचा वारसाहक्क सांगता येणार नाही. निवासी रहात असलेल्या खोलीची मालकी संस्थेची आहे हे लक्षात ठेवावे.

२९ सनवर्ल्डमधून काही काळ गैरहजर रहायचे असल्यास व्यवस्थपनाला तशी पूर्व सूचना द्यावी लागेल.

३० सनवर्ल्ड सोडून जायचे असल्यास संस्थेला कमीतकमी एक महीन्याची लेखी पूर्वसूचना द्यावी लागेल.

स्वाक्षरी